# पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**ठिकाण :- गंगाधर देशमुख सभागृह,**
**आरसीएफ कॉलनी, चेंबूर,**
**मुंबई-४०००७४.**

**दिनांक:- २६.११.२०२१**
**वेळ:-दुपारी १२.०० वाजता**

**प्रस्ताव:**

मे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड, भारत सरकारचा उपक्रम (खत विभाग, रसायन आणि खत मंत्रालय) यांच्या ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान कारखान्यात ४२५ मे. टन. प्रती दिन क्षमतेच्या नवीन अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट संयंत्राची स्थापना करण्याबाबत.

**पार्श्वभूमी:**

प्रकल्प प्रवर्तक - आरसीएफ, ने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण (म.प्र.नि.) मंडळाकडे आरसीएफ च्या ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान कारखान्यात ४२५ मे. टन. प्रती दिन क्षमतेच्या नवीन अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट प्रकल्पाची स्थापना करण्याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी चा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावासाठी जनसुनावणीसाठी योग्य तारीख सुचवावी अशी विनंती म.प्र.नि. मंडळामार्फत जिल्हा दंडाधिकारी, मुंबई उपनगर यांना दि. २८/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर, यांनी दिनांक २६/११/२०२१ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दैनिक नवशक्ति" या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच "दैनिक फ्री प्रेस जर्नल" या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक २२/१०/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.

सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी सादर केलेल्या पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवालाच्या प्रती इंग्रजी व मराठी भाषेत, जनतेच्या अभ्यासासाठी खालील ठिकाणी ठेवण्यात आल्या होत्या :

i) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, १०वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई,

ii) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई,

iii) सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई,

iv) सहाय्यक आयुक्त, एम (पश्चिम) वार्ड, ऑफिस बिल्डींग, शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई,

v) उद्योग सहसंचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई शहर व उपनगरे, ७०२, ७वा मजला, विकास सेंटर, डॉ. सी. जी. गिडवानी मार्ग, वाडवली गाव, चेंबूर, मुंबई,

vi) प्रादेशिक अधिकारी / उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.

या प्रस्तावित प्रकल्पाबाबत सर्वसामान्य जनतेस त्याच्या प्रतिक्रिया, विचार, सूचना किंवा हरकती पाठवाव्यात आवाहन करण्यात आले होते.

**पर्यावरण विषयक जनसुनावणी:**

मे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) द्वारा ट्रॉम्बे, मुंबई येथील त्यांच्या विद्यमान कारखान्यात ४२५ मे. टन. प्रती दिन क्षमतेच्या नवीन अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट संयंत्राची स्थापना करण्याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी २६ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी १२:०० वाजता, गंगाधर देशमुख सभागृह, आरसीएफ कॉलनी, चेंबूर, मुंबई ४०००७४ या ठिकाणी आयोजित करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ च्या कार्यालयीन आदेश क्र. E-१०५/२०२१ दिनांक ०३/११/२०२१ नुसार, गठित केलेल्या समितीचे खालील सदस्य उपस्थित होते-

१. **डॉ. विकास नाईक** - **अध्यक्ष**
निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

२. **श्री. जयवंत हजारे** - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

३. **श्री. सुजीत ढोलम** **समन्वयक**
उपप्रादेशिक अधिकारी मुंबई-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आरसीएफ च्या ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान कारखान्यात ४२५ मे. टन. प्रती दिन क्षमतेच्या नवीन अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट प्रकल्पाची स्थापना करण्याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त खाली दिल्याप्रमाणे आहे.

सर्वप्रथम जनसुनावणीचे समन्वयक श्री सुजीत ढोलम यांनी सर्वांचे स्वागत करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीच्या कार्यवाहीस सुरवात केली.

त्यांनी हि जनसुनावणी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेले (MoEFCC) पर्यावरण आघात मूल्यांकन अधिनियम, २००६ नुसार, तसेच कोविड-१९ महामारी बाबत ऑफिस मेमोरंडम दिनांक ०९/०६/२०२१ च्या तरतूदींनुसार घेण्यात येत आहे असे सांगितले.

या जनसुनावणीचा उद्देश स्थानिक लोकांना प्रस्तावित प्रकल्पा विषयी जागरूक करणे, आणि प्रकल्पाच्या प्रस्तावकांच्या प्रस्तावित पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती देणे हा आहे.

प्रकल्पाच्या प्रस्तावकांचे प्रकल्प सल्लगार — मे. प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडिया लिमिटेड, प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर उपस्थित नागरिक त्यांच्या सूचना/विचार सादर करू शकतात. तसेच ते लेखी स्वरूपातही सादर करता येईल असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे माहिती दिली की मे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड, ट्रॉम्बे, मुंबई येथे नवीन एएन मेल्ट प्लांट स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत एक उपक्रम आहे.

तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, स्थानिक लोकंच्या टीका व टिपणींची नोंद घेऊन त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हा आहे. प्रकल्पास पर्यावरण विषयक अनुमति देण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार या समितीस नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी असे श्री. ढोलम यांनी स्पष्ट केले.

प्रकल्पाच्या प्रस्तावकांच्या वतीने, श्री. ए. के. सिंह, महाप्रबंधक, मे. प्रोजेक्टस अँड डेवेलपमेंट इंडिया लिमिटेड (पी.डी.आय.एल) – पर्यावरणविषयक प्रकल्प सल्लागार, यांनी प्रकल्पाबाबत तपशीलवार प्रस्तुतीकरण केलेआणि पर्यावरण आघात मूल्यांकन अभ्यासाचा तपशील सादर केला.

तदनंतर श्री. सुजीत ढोलम, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई-३ यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रश्न-उत्तरांसाठी सत्र खुले केले व प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक प्रश्न विचारण्यासाठी उपास्थितांना आमंत्रित केले. तसेच प्रश्न विचारताना प्रश्नकर्त्याने सुरूवातीला आपले नाव आणि पत्ता सांगावा अशी सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न आणि टिप्पण्यांचा तपशील आणि प्रकल्प प्रस्तावकांच्या प्रतिनिधींनी दिलेली उत्तरे खालीलप्रमाणे सारांशित केली आहेत:**

१) **श्री. सतीश देशपांडे, वाशी गांव, चेंबूर.**

**प्रश्न:** प्रकल्पाच्या प्रस्तुतीकरणा दरम्यान असे सांगितले गेले की अमोनियम नायट्रेट (AN) मेल्ट चे वार्षिक उत्पादन १.४ लाख मे. टन ते १.९ लाख मे. टन वाढल्यावर किंवा नवीन एएन मेल्ट संयंत्र सुरू झाल्यावर पर्यावरणावर नगण्य परिणाम होईल. तर नगण्य म्हणजे किती नगण्य? की परिणाम नाहीच होणार? आरसीएफ मध्ये किती वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी यंत्रणा आहेत आणि त्यांची संख्या वाढवू शकता का?

**उत्तर:** प्रकल्प सल्लागाराने सांगितले की पर्यावरण प्रभाव मूल्यांकना दरम्यान, विद्यमान क्षमता आणि वाढीव क्षमता या मध्ये होणाऱ्या उत्सर्जना चा डिस्पर्शन मॉडेलिंग (Dispersion Modelling) तंत्राद्वारे अत्याधुनिक सॉफ्टवेअर वापरून अभ्यास केला गेला. या अभ्यासामध्ये अमोनियाचे वाढीव ग्राउंड लेव्हल कॉन्संट्रेशन हे ०.०२ मायक्रो ग्रॅम प्रति घन मीटर आढळून आले, जे की नगण्य प्रमाणात आहे.

प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले की आरसीएफ कारखान्यामध्ये चार वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी स्टेशन्स आहेत. आय.आय.टी. मुंबई यांच्या द्वारा वाऱ्याची दिशा आणि अन्य गोष्टींचा अभ्यास करुन ह्या Monitoring Stations ची संख्या व ठिकाणे निश्चित केली गेली होती.

२) **श्री. विद्याधर जोशी, गांधी मैदान, गावठाण, चेंबूर.**

**प्रश्न:** प्रकल्पाच्या प्रस्तुतीकरणा दरम्यान असे सांगितले गेले की प्रस्तावित प्रकल्पाकारिता जे पाणी लागेल ते पाणी (सिवेज ट्रीटमेंट सयंत्र मधून) इन-हाउस पद्धतीने पुरवले जाईल. तरी या पाण्याची उत्पादन क्षमता, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादि पद्धतीने वाढवण्याचा आरसीएफ चा विचार आहे का? तसेच प्रस्तावित प्रकल्पाकारिता विजेची सुद्धा गरज लागेल, ती इन-हाउस पद्धतीने किंवा काही प्रमाणात मे. टाटा पॉवर कडून उपलब्ध केली जाईल असे सांगितले गेले. मला असे विचारायचे आहे की आरसीएफ कडे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प विचाराधीन आहे का?

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले की चेंबूर परिसराची समुद्र पातळी पासून उंची केवळ ६ मीटर आहे. त्यामुळे भूजल पातळी फार वर आहे. म्हणून रेन वॉटर हार्वेस्टिंग ची आवश्यकता नाही. तथापि आरसीएफ कारखान्याच्या परिसरात दोन तलाव आहेत. त्या व्यतिरिक्त आरसीएफने सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा उभारलेली आहे ज्यातील प्रक्रियाकृत पाणी आरसीएफ सयंत्रामध्ये वापरले जाते.

तसेच सौर ऊर्जा निर्मिती संदर्भात आरसीएफ ने आधीच २ मे. वॅट. चा जमिनीवर स्थापीत (ग्राऊंड माऊंटेड) सौर ऊर्जा प्रकल्प उभारलेला आहे. शिवाय आरसीएफ कारखाना परीसरातील काही इमारती वरती सौर ऊर्जा निर्मितीसाठी सोलार पॅनेल बसवले आहेत.

३) **श्री. श्रीकांत कडू, वित्त संचय, चेंबूर.**

**प्रश्न:** अमोनियम नायट्रेटची उत्पादन क्षमता वाढणार, तर गेट क्रमांक 2 जवळील टँकर पार्किंग क्षेत्राची क्षमताही वाढवावी जेणेकरून स्थानिक रहिवाशांना त्रास होऊ नये. कारण अमोनियम नायट्रेटची क्षमता वाढल्याने त्यानुसार टँकरची वाहतूकही वाढणार आहे असे वाटते.

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले की एएन मेल्ट चे उत्पादन वाढल्यामुळे एकूण टँकरच्या संख्येत नगण्य बदल होईल. कारण नायट्रिक ॲसिड आणि अमोनिया जे एएन मेल्टसाठी कच्चामाल आहे सद्यस्थितीत टँकर्सद्वारे विकले जाते आणि एएन मेल्टचे उत्पादन वाढल्याने या अमोनिया आणि नायट्रिक ॲसिडचा इन हाऊस वापर वाढेल. यामुळे अमोनिया आणि नायट्रिक ऍसिडच्या विक्री समतुल्य प्रमाणात कमी होईल आणि परिणामी अमोनिया आणि नायट्रिक ॲसिडच्या टँकरची संख्या देखील कमी होईल. अशा प्रकारे टँकरच्या एकूण संख्येत नगण्य बदल होणार आहे. आरसीएफने पुढे माहिती दिली की त्यांनी आरसीएफ ट्रॉम्बे फॅक्टरी गेट क्र. २ च्या समोरील  च्या टँकर्स पार्किंग क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत. असेही लक्षात आले आहे कि आरसीएफ गेट क्र. २ च्या बाहेरील रस्त्या लगत काही  टँकर्स अनधिकृतपणे पार्किंग केलेले असतात. या संदर्भात आरसीएफ ने बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच वाहतूक पोलीस विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांना देखील कळवले आहे. गेट क्र. २ च्या बाहेरील वाहतूक कोंडी कमी होण्यासाठी आरसीएफ नेहमीच प्रयत्न करत असते आणि यापुढे सुद्धा प्रयत्न करत राहील.

४) **श्री. जयंत केळकर, स्वस्तिक पार्क, चेंबूर.**

**प्रश्न:** चेंबूर मध्ये आरसीएफ मुळे प्रदूषण खूपच कमी आहे, जवळ जवळ नाहीच आहे. आरसीएफ सामाजिक दायित्व देखील फार पूर्वी पासून पार पाडत आली आहे. त्यात चेंबूर हरित प्रकल्प, वृक्षारोपण, वृक्षांचे रोपे वाटप हे विशेष वाखाण्याजोगे आहे. तसेच आरसीएफ मधील सामाजिक संघटनानी चेंबूर परिसरात बरेच सामाजिक कार्य केले आहेत. आरसीएफ ही एक अशी कंपनी आहे जी सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते आपल्या संयंत्रात वापरते जेणेकरून मुंबईतील नागरिकांना विशेषतः चेंबूर मधील रहिवाश्यांना पाण्याची कमतरता भासणार नाही.

मला असे विचारायचे आहे की आरसीएफ मधील कर्मचाऱ्यांचे नियमित वैद्यकीय तपासणी होते का? एएन मेल्ट चे आयतावरची अवलंबित्व कमी करून देशाला एएन मेल्ट च्या उत्पादनात आत्मनिर्भर करण्यासाठी आरसीएफ ची आणखी काय योजना आहे?

**उत्तर:** प्रकल्पाच्या प्रवर्तकाने सांगितले की एएन मेल्ट ची मागणी लक्षात घेता PCPIR पारादीप, ओडिशा येथे नवीन एएन मेल्ट संयंत्र उभरण्याची आरसीएफ ची योजना आहे आणि त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. प्रकल्पाच्या प्रवर्तकाने हे देखील स्पष्ट केले कि आरसीएफ मधील कर्मचाऱ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते.

५) **श्री. जयंत प्रकाश सिंह, राजकुंज सोसायटी, चेंबूर.**

**टिप्पणी:** आमच्या राजकुंज सोसायटीमध्ये १२५ सदनिका आहेत आणि डोंगरे पार्कमध्ये २२० सदनिका असून ह्या ३५० सदनिकांमध्ये साधारण पणे ४०० ते ५०० ज्येष्ठ नागरिक राहतात. या ज्येष्ठ नागरिकांसाठी आरसीएफकडून आपात्कालीन परिस्थितीत नेहमीच वैद्यकीय मदत मिळत आली आहे. आमच्या परिसरात खूप साप आढळतात आणि आरसीएफ मध्ये जे सर्पमित्र आहेत ते आम्हाला सर्प पकडून जंगलात सोडण्यासाठी मदत करतात. आरसीएफने नेहमीच सामाजिक कार्यात योगदान दिले आहे. आरसीएफ ची अशीच भरभराट होत राहो ही आमची इच्छा आहे.

समितीच्या अध्यक्षांनी अधिवेशनाचा समारोप केला आणि संगितले की लोकांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे प्रकल्प प्रवर्तकाने समाधानकारकपणे निराकरण केले आहे.

शेवटी जन सुनावणी समितीचे समन्वयक श्री. सुजीत ढोलम यांनी सांगितले की उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आली आहे. तसेच, आजच्या जनसुणावणीचे इतिवृत्त व सार्वजनिक सुनावणी सहभागी असलेल्यांची आपली निवेदने ही पुढे पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MoEFCC), भारत सरकार यांचेकडे पाठविले जाईल.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी उपस्थित राहून शांततेत आपले विचार मांडल्याबद्दल श्री. सुजित ढोलम यांनी उपस्थितांची आभार मानले व माननीय अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले व अध्यक्षांचे आभार मानून सभेची सांगता झाली.

**(श्री. सुजीत ढोलम)**
उपप्रादेशिक अधिकारी मुंबई-3,
म. प्र. नि. मंडळ, मुंबई
तथा समन्वयक
जनसुनावणी समिती

**(श्री. जयवंत शं. हजारे)**
प्रादेशिक अधिकारी
म. प्र. नि. मंडळ, मुंबई
तथा सदस्य
जनसुनावणी समिती

**(डॉ. विकास नाईक)**
निवासी उप जिल्हाधिकारी तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा व अध्यक्ष
जनसुनावणी समिती

*******************************************************

# Minutes of Meeting for the Environmental Public Hearing

**Venue- Gangadhar Deshmukh Hall,**
**RCF Colony, Chembur,**
**Mumbai 400074**

**Date-26.11.2021**
**Time-12.00 Noon**

**Proposal:**

Setting-up of a new Ammonium Nitrate (AN) Melt plant of 425 MT per day a capacity at M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited, Trombay, Mumbai - a Government of India Undertaking Department of Fertilizers, Ministry of Chemicals and Fertilizers.

**Background:**

Maharashtra Pollution Control Board received an application from Project Proponent – M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited, for conducting an environmental public hearing regarding the setting-up of a new Ammonium Nitrate (AN) Melt plant of 425 MT per day capacity at Trombay Unit, Mumbai. MPC Board requested to District Magistrate, Mumbai Suburban vide letter dated 28.09.2021 to suggest suitable date for the Public hearing for said proposal.

District Magistrate, Mumbai Suburban, has fixed the date for conducting environmental public hearing on 26/11/2021. The advertisement for this public hearing was published one month in advance in the daily newspaper "Navshakti" in Marathi language and also in the daily newspaper "The Free Press Journal" in English language on 22/10/2021.

Copies of the Environmental Impact Assessment Report in English and Marathi language submitted by the Project Proponent of the proposed project were made available at the following offices for public study:

i) Office of the Collector, Mumbai Suburban, 10th Floor, Administrative Building, Government Colony, Bandra (East), Mumbai,
ii) Department of Environment, Government of Maharashtra, 15th Floor, New Administrative Building, Mantralaya, Mumbai,
iii) Joint Director (Water Pollution Control), Headquarters, MPC Board, Sion, Mumbai,
iv) Assistant Commissioner, M (West) Ward, Office Building, Sharadbhau Acharya Marg, Chembur, Mumbai.
v) Joint Director of Industries Mumbai, Metropolitan Region, Mumbai City & Suburbs, 702, 7th Floor, Development Center, Dr. C. G. Gidwani Marg, Wadwali Village, Chembur, Mumbai,
vi) Regional Officer / Sub-Regional Office, MPC Board, Sion, Mumbai.

The public in general were appealed to send in any comment, view, suggestions or objections regarding the proposed Project.

**Public hearing:**

The Environmental Public Hearing for proposed setting-up of a new Ammonium Nitrate (AN) Melt plant of 425 MT per day capacity at Trombay, Mumbai of M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited (RCF) was held on 26/11/2021 at 12:00 Noon at Gangadhar Deshmukh Hall, RCF Colony, Chembur, Mumbai 400074.

As per Office order No. E-105/2021 dated 03/11/2021 of Maharashtra Pollution Control Board, following committee members were present:

1. **Dr. Vikas Naik** — **- Chairman**
   Addl. District Magistrate,
   Mumbai Suburban District
2. **Shri. J. S. Hajare** — **- Member**
   Regional Officer,
   Maharashtra Pollution Control Board, Mumbai
3. **Shri. Sujit Dholam** — **- Convener**
   Sub-Regional Officer Mumbai-3,
   Maharashtra Pollution Control Board, Mumbai

The Minutes of the meeting for the Environmental Public Hearing for proposed new Ammonium Nitrate (AN) Melt plant of 425 MT per day a capacity at M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited, Trombay, Mumbai is as given below.

The details of the proceedings are as follows –

At the outset, Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB and the Convener of the public hearing, welcomed all.

With the permission of the Chairman, the proceedings of the public hearing were started. Shri. Dholam, Sub-Regional Officer, MPCB informed that this public hearing was being held in accordance with the provisions of the Environmental Impact Assessment Notification, 2006 and the provisions of the Office Memorandum dt. 09/06/2021 regarding Covid-19 pandemic issued by the Ministry of Environment, Forests and Climate Change (MoEFCC).

Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPC Board Convener informed that the purpose of this public hearing is to make the local people aware about the proposed project and the environment management plan proposed by the Project Proponent.

Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPC Board explained that, at the beginning, the Project Consultant Project Proponent - M/s Projects and Development India Limited will present information about the project, and then the local residents can express their suggestions / views. He further stated that the same can also be submitted in writing.

He further informed that the proposal is for setting-up new AN Melt plant at M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited, Trombay, Mumbai. The proposal is an initiative under 'Aatmnirbhar Bharat' Abhiyan.

Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB also informed that the scope of this committee is to conduct public hearings, take note of the objections and comments of the local people and submit the proceedings to the government. He informed the audience that this committee is not empowered to take any decisions as regards to granting of any environment related permissions to the said project.

On behalf of the Project Proponents, Shri. A. K. Singh, General Manager, M/s Projects and Development India Limited (PDIL), the Environmental Consultant of the project, gave a detailed presentation about the project and details of the Environmental Impact Assessment Study.

Thereafter, Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, opened the question and answer session with the permission of chairman of the committee and invited the members of the public to express environmental related concerns regarding the project and asked them to mention their name and address before asking the question.

**Details of the questions asked and comments given by the citizens present and the answers given by the representatives of the Project Proponents to the same are summarized as follows:**

**1) Shri. Satish Deshpande, Vashi village, Chembur.**

**Question:** During the presentation of the project it was mentioned that, the increase in annual production of Ammonium Nitrate (AN) Melt from 1.40 Lakh MT to 1.90 Lakh MT or after commissioning of new AN Melt, there will be negligible effect on the environment. So negligible is how much negligible? or there won't be any effect at all? Also, how many ambient air monitoring stations are there in RCF and can you increase their number?

**Answer:** The project consultant stated that during the environmental impact assessment, the emission from existing capacity and increased capacity was studied using latest software of Dispersion Modelling technique. In this study,

the increased ground level concentration of Ammonia was found to be 0.02 micrograms per cubic meter, which is negligible.

Project Proponent further stated that at RCF Trombay unit, RCF has four Ambient Air Quality Monitoring Stations. The number and locations of these Monitoring Stations were determined by IIT, Mumbai, by studying wind direction and other related parameters.

**2) Shri. Vidyadhar Joshi, Gandhi Maidan, Gaothan, Chembur.**

**Question:** During the presentation of the project it was mentioned that the water required for the proposed project will be met in-house (from the sewage treatment plant). Does RCF employ rainwater harvesting? The proposed project will also require electricity, which it was informed that is either produced in-house or to some extent will be made available from M/s Tata Power. Is RCF having a solar power generation project under consideration?

**Answer:** Project proponent stated that, in the factory area, the groundwater level is quite high, due to the proximity to the sea. RCF is maintaining two ponds inside the RCF factory premises. In addition, RCF has also set-up two Sewage Treatment Plants. Treated water from these Sewage Treatment Plants is used to meet the process water requirement of RCF factory.

Also, in terms of solar power generation, RCF has already installed a 2 MWp ground mounted solar power generation facility. Moreover, solar panels have been installed for solar power generation on some of the buildings in the RCF factory premises.

**3) Shri. Shrikant Kadu, Vittasanchay Society, Chembur.**

**Question:** While the production of Ammonium Nitrate increases, the capacity of the tanker parking area near Gate No. 2 should also be increased so that it does not disturb the local residents. Because, as the production of Ammonium Nitrate increases, the number of tankers will also increase.

**Answer:** The Project Proponent stated that there will be only a negligible change in the total number of tankers due to increase in AN Melt production. This is because, Nitric Acid and Ammonia which are raw materials for AN Melt are being sold by tankers and increasing production of AN Melt will lead to increase in in-house consumption of this Ammonia and Nitric acid. This will result in equivalent reduction of sale Ammonia and Nitric Acid and thereby reduction in tanker movement of Ammonia and Nitric acid. Thus there will be a negligible change in the total number of tankers.

Also RCF further informed that it has made improvements to the dedicated tanker parking area in front of the RCF Trombay Factory Gate No. 2 for tankers transporting RCF products. It is has been noticed that some unauthorized tankers are parked on the road near RCF Gate No 2. In this regard, RCF has taken-up the matter with concerned officials of Brihanmumbai Municipal Corporation (BMC) and also with Traffic Police Department. RCF has always worked and will continue to work to reduce traffic congestion outside Gate No. 2.

**4) Mr. Jayant Kelkar, Swastik Park, Chembur.**

**Question:** Pollution due to RCF in Chembur is very low, almost non-existent. RCF has also been carrying out various social activities since long time. Among them, Chembur Green project, tree plantation, distribution of tree saplings etc. are especially noteworthy. Also the social organizations within RCF have done a lot of social work in Chembur area. RCF is a company that produces water from sewage and uses it in its plant so that the citizens of Mumbai, especially the residents of Chembur, will not face water shortage. I would like to ask, whether the medical check-up of the RCF employees is done regularly? Also, what else does RCF plan to make the country self-sufficient in AN Melt production and reducing dependence on imported AN Melt?

**Answer:** The project proponent informed that in view of the demand of AN Melt, in addition to the proposed new AN melt plant at Trombay, RCF is also exploring to setting-up a additional new AN Melt plant at Petroleum, Chemicals and Petrochemicals Investment Region (PCPIR) Paradeep, Odisha and has initiated efforts in that direction. The Project Proponent also clarified that regular medical check-ups of RCF employees are being carried out.

**5) Mr. Jayant Prakash Singh, Rajkunj Society, Chembur.**

**Comment:** Our Rajkunj Society has about 125 flats and in Dongre Park about 220 flats with approx. 400 to 500 senior citizens living in these flats. These senior citizens have always received medical help from RCF in case of emergency. There are a lot of snakes in our area and the snake catcher (Sarp Mitra) in RCF help us to catch snakes and release them in the forest. RCF has always contributed to social work. We want RCF to continue to thrive.

The Chairman of the Committee concluded the session and informed that all the queries raised by the people have been addressed satisfactorily by the Project Proponent.

Finally, the Convener of the public hearing committee, Shri. Sujit Dholam said that points raised by the audience today have been noted. Also, the minutes of today's public hearing, along with submissions of the Public hearing participants will be forwarded to the Ministry of Environment, Forests and Climate Change (MoEFCC), Government of India.

After that, Shri. Sujit Dholam thanked the audience for attending the environmental public hearing of subject project and expressing their views in a peaceful manner. With the permission of the Hon'ble Chairman, the Convener of the committee Shri. Sujit Dholam declared that the Environmental Public Hearing has ended and concluded the meeting by thanking the Chair.

**(Shri. Sujit Dholam)**
Sub-Regional Officer,
MPC Board, Mumbai-3 and
Convener, Public Hearing
Committee

**(Shri. J. S. Hajare)**
Regional Officer,
MPC Board, and Member,
Public Hearing Committee

**(Dr. Vikas Naik)**
Addl. Dist. Magistrate,
Mumbai Suburban District and
Chairman,
Public Hearing Committee

*******************************************************

Note: Original MoM in marathi language are signed by chairman of the committee.